विशेष केंद्रीय सहाय्याचे वितरणाबाबत

१) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (म.),मुंबई.

२) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.), मुंबई.

३) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामं. (म), मुंबई.

४) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई.

महाराष्ट्र शासन,

शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०१२/प्र.क्र.(०३/१२)महामंडळे,

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

मंत्रालय, विस्तार मुंबई- ४०० ०३२,

दिनांक :- ३०/०३/२०१३.

वाचा :- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र.०३/महामंडळे, दि. ०५ फेब्रुवारी २०१३.

२) सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली
यांचे पत्र क्र.११०१४/२०/२०१२/दिनांक २८.३.२०१३.

**प्रस्तावना :-** अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत राबवण्यित येणा-या योजनांसाठी पूरक म्हणून केंद्र शासनाकडून प्रतिवर्षी केंद्रीय सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते. हे विशेष केंद्रिय सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील ३ मागासवर्ग महामंडळे व खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना अनुदान स्वरुपात देण्यासाठी तसेच आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत विविध प्रशिक्षण योजना राबविण्यासाठी वितरित करण्यात येते.

२. सन २०११-१२ मधील केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात आलेली रक्कम रु. १९७७.९८ लाख रकमेचे उपयोगीता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर करण्यात आले आहे. तदनंतर केंद्र शासनाकडून सन २०१२-१३ साठीचा विशेष केंद्रीय सहाय्याची रक्कम पहिला हप्ता म्हणून रु.३,०६६.६६ लाख शासनास यापूर्वी प्राप्त झाली आहे. सदरील प्राप्त रकमेचे उपरोक्त संदर्भिय क्र.(२) येथील शासन निर्णयान्वये महामंडळांना वितरण करण्यात आले आहे. आता, संदर्भिय क्र.(१) च्या केंद्र शासनाच्या पत्रान्वये दुसरा हप्ता म्हणून रु.२५४६.३४ लाख रुपये शासनास प्राप्त झाले आहेत. सदरील रक्कम या विभागाच्या अधिपत्याखालील ३ मागासवर्ग महामंडळांना व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचेमार्फत अनुसूचित जाती व नवबौध्दांसाठी राबविण्यात येणा-या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना अनुदान स्वरुपात देण्यासाठी व विविध प्रशिक्षण योजना राबविण्यासाठी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** सन २०१२-१३ मध्ये केंद्र शासनाकडून दुसरा हप्ता अंतर्गत प्राप्त झालेली विशेष केंद्रीय सहाय्याची अवितरित रक्कम रु.२५४६.३४ लाख (अक्षरी रु.पंचवीस कोटी शेहेचाळीस लाख चौतीस हजार फक्त) विभागाच्या अधिपत्याखाली ३ मागासवर्गीय महामंडळे व महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग विकास महामंडळ यांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या विवरणपत्रातील रकाना क्र.६ मध्ये त्याच्या समोर दर्शविल्यानुसार वितरीत करण्यास शासन खालील अटी व शर्तीवर मंजूरी देत आहे.

(१) दारिद्रय रेषेखालील केवळ अनुसूचित जातीतील अल्पभूधारक शेतकरी, लहान शेतकरी, पीक हिस्सेदार (क्रॉप शेअर्स होल्डर) भूमिहीन मजूर, गावातील कारागीर, सुशिक्षित बेरोजगार तरुण या लक्ष्य गटाकरिता खास तयार केलेल्या उत्पन्न देणा-या योजनांसाठी सदर रक्कम उपयोगात आणण्यात यावी. केंद्र शासनाच्या दि.०६ ऑक्टोबर, १९९८ च्या विशेष केंद्रीय सहाय्य उपयोगिता मार्गदर्शक तत्वानुसार विशेष केंद्रीय सहाय्याच्या मंजूर निधीपैकी १५% एवढी रक्कम फक्त अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील महिलांसाठी व ५% एवढी रक्कम फक्त अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील अपंग लाभार्थ्यांवर खर्च करण्यात यावी.

(२) सदर निधीचा ५०% वापर हा अनुदान योजना, बीज भांडवल कर्ज योजना, एन.एस.एफ.सी.मुदती कर्ज योजना, महिला समृध्दी योजना, लघुऋण वित्त योजना या योजनांच्या अनुदानासाठीच करण्यात यावा.

(३) व्यवसाय प्रशिक्षण योजनेवर मंजूर निधीच्या ५% मर्यादेतच खर्च करावा.

(४) महामंडळाकडून राबविण्यात आलेल्या विशिष्ट योजना आवश्यकता असल्यास महामंडळाच्या संचालक मंडळाकडून तपशीलवार मान्य करुन घेण्यात याव्यात.

(५) विशेष केंद्रिय सहाय्य उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनाच्या विहित विवरणपत्रामध्ये स्वयंस्पष्ट माहिती भरुन प्रत्येक तिमाही प्रगती अहवाल, तिमाही कालावधी संपल्यानंतरच्या पुढील महिन्याच्या १० तारखेपूर्वी शासनास सादर करण्यात यावा.

(६) लिड बँका /राष्ट्रीयीकृत / सहकारी बँका या वित्तीय संस्थांकडून उपलब्ध असलेल्या अर्थ सहाय्याबरोबर अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत लाभार्थ्यांना प्रदान करण्यात आलेल्या बीज भांडवली अर्थसहाय्याची विशेष केंद्रिय अर्थसहाय्याशी सांगड घालण्यात यावी.

(७) वीस कलमी कार्यक्रमांतर्गत प्रत्येक महिन्याच्या शेवटी, लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या अनुदानाचा खर्च शासनास कळविण्यात यावा. त्याचप्रमाणे प्रत्येक तिमाहीच्या शेवटी केंद्र शासनाकडे सादर करावयाच्या विहित प्रपत्रात उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

(८) उपयोगिता प्रमाणपत्र सादर करताना सुरुवातीची शिल्लक, मंजूर करण्यात आलेला निधी, एकूण उपलब्ध निधी, त्यातून झालेला खर्च व तिमाहीच्या शेवटची शिल्लक यांची आकडेवारी सुसंगत असल्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

३. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे सदर अनुदानाबाबत नियंत्रक अधिकारी राहतील. वरील महामंडळांना निधी आहरण व संवितरण करण्याचे अधिकार प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, मुंबई यांना प्रदान करण्यात येत आहेत. त्यांनी अनुदानाच्या रक्कमेचा महालेखापालांच्या लेख्यांशी ताळमेळ घालण्याचे काम पहावे.

यावर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा :-

मागणी क्र. एन-३

२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण-

०१, अनुसूचित जातीचे कल्याण, २७७ शिक्षण

७९३, अनुसूचित जातीच्या घटक योजनेसाठी विशेष केंद्रिय सहाय्य-

पंचवार्षिक योजनांतर्गत योजना

(०१) अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना

(०१)(०१) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मर्यादित, मुंबई अर्थसहाय्य

(२२२५ ०२२५) ३३ अर्थसहाय्य

(०१)(०६) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मर्यादित, नवी मुंबई अर्थसहाय्य

(२२२५ ०२७ २) ३३ अर्थसहाय्य

(०१)(०४) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, (मर्यादित), मुंबई, अर्थसहाय्य

(२२२५ ०२५ २) ३३ अर्थसहाय्य

(०१)(०२) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई, अर्थसहाय्य

(२२२५ ०२३ ४) ३३ अर्थसहाय्य

४. हा खर्च सन २०१२-२०१३ या चालू वित्तीय वर्षाकरिता वरील लेखा शिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा व मासिक खर्च विवरणपत्रानुसार (कॅश फ्लो) खर्च करण्यात यावा.

५. सदरहू शासन निर्णय, वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र.२९६ व्यय-१४ दिनांक ३०/०३/२०१३ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( शिरीष मोहोड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति-

D:\vilas12\SCA New Sub\CR3.2012\CR-3-2012-G R.28313.rtf

महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा परिक्षा), मुंबई/ नागपूर,
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
अपर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई,
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, कोकण विभाग, नवी मुंबई,
वित्त विभाग (व्यय-१४/ अर्थसंकल्प-७ /अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई,
उपसचिव, भारत सरकार, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली,
प्रधान सचिव आणि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली,
व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, (मर्यादित), मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, (मर्यादित), मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ,(मर्यादित)मुंबई,
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई,
कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प / नियोजन /विघयो-२ /विजाभज) सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय,
निवड नस्ती, महामंडळे.

## परिशिष्ट-अ

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. : संकीर्ण २०१२/ प्र.क्र.(०३/१२) महामंडळे दि. ३०.३.२०१३ चे सहपत्र

## विशेष केंद्रीय सहाय्य सन २०१२-१३

(रुपये लाखात)

| १ | महामंडळाचे नांव | सांकेतांक क्र. | २०१२-१३ मध्ये अर्थसंकल्पित तरतूद | पहिला हप्ता अंतर्गत यापूर्वी वितरित केलेली रक्कम | या शासन निर्णयान्वये वितरित केलेली रक्कम (अंकीत व अक्षरीत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ६ |
| १. | महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, (मर्या.), मुंबई. | २२२५ ०२२५ | १६००.०० | १५००.०० (रु. पंधरा कोटी फक्त) | १००.०० (रु.एक कोटी फक्त) |
| २ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई | २२२५ ०२७२ | १६००.०० | ९१६.६६ (रु. नऊ कोटी सोळा लाख सासस्ट हजार फक्त) | ६८३.३४ (रु.सहा कोटी त्र्याऐंशी लाख चौतीस हजार फक्त) |
| ३ | संत रोहिदास चर्मोद्योग च चर्मकार विकास महामंडळ (मर्या.), मुंबई | २२२५ ०२५२ | १६००.०० | ५००.०० (रु. पाच कोटी फक्त) | ११००.०० (रु. अकरा कोटी फक्त) |
| ४ | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई | २२२५ ०२३४ | १२००.०० | १५०.०० (रु. दीड कोटी फक्त) | ६६३.०० (रु. सहा कोटी त्रेसष्ट लाख फक्त) |
| | एकूण | | ६०००.०० | ३०६६.६६ (रु.तीस कोटी सासस्ट लाख सासस्ट हजार फक्त) | २५४६.३४ (रुपये पंचवीस कोटी शेचाळीस लाख चौतीस हजार फक्त) |

(शिरीष मोहोड)
शासनाचे अवर सचिव